# नीति आयोगाच्या उपाध्यक्षपदी

# डॉ. राजीवकुमार

**नवी दिल्ली :** नीति आयोगाच्या उपाध्यक्षपदी डॉ. राजीवकुमार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राजीवकुमार हे नीति आयोगाचे दुसरे उपाध्यक्ष ठरतील.



अरविंद पनगढिया यांनी नीति आयोगाच्या उपाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याने रिकाम्या झालेल्या पदावर राजीवकुमार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पनगढिया हे ३० दिवसांच्या नोटीसवर आहेत. ते १ सप्टेंबरला पदमुक्त होणार आहेत.

डॉ. राजीवकुमार हे प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ असून, त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेवर आतापर्यंत अनेक पुस्तके लिहिली आहेत. लखनौ आणि ऑक्सफर्ड विद्यापीठात त्यांचे शिक्षण झाले आहे. याशिवाय २०१० ते २०१२ मध्ये ते इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड इंडस्ट्री (एफआयसीसीआय)चे सरचिटणीस होते. ▸▸ पान ७ वर....

**(पान** १ वरून) राजीवकुमार हे २००६ ते २००८ मध्ये भारत सरकारच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाचे सदस्य होते. एशियन डेव्हलपमेंट बँक आणि अर्थ, उद्योग मंत्रालयांमधील कामांचा त्यांना अनुभव आहे. सेंटर फॉर पॉलिसी रिसर्च (सीपीआर)चे ते सीनिअर फेलो आणि पहले इंडिया फाऊंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक आहेत..